# चैतन्य लहरी

नोव्हेंबर/डिसेंबर २००३
अंक क्र. ११/१२








# अनुक्रमणिका


- तुझा विसर न व्हावा. ........ २
- दिवाळी पूजा, २००३. ........ ३
- नवरात्री पूजा -न्यू जर्सी, अमेरिका, २००३........ ४
- गौरी जन्मदिन पूजा, न्यूयॉर्क, १२ ऑक्टोबर २००३ ........ ५
- सहजयोग्यांची प्रगल्भता - प.पू.श्रीमाताजी निर्मलादेवींचे प्रवचन १९८२........ ६
- सहजयोगात परिपक्व व्हा - प.पू.श्रीमाताजी निर्मलादेवींचे प्रवचन ........ ९
- गणपत्यथर्वशीर्ष: भावार्थ ........ १३
- प.पू.श्रीमाताजी निर्मलादेवींचे प्रवचन- स्वीत्झर्लंड-१९८३ ........ १५
- गणपतीपुळे सेमिनार २००३ पुर्व तयारी हवन कार्यक्रम ........ १८
- गणपतीपुळ्याचा 'गणपती' ........ २०
- सहज समाचार........ २२


चैतन्य लहरी, सहजयोग केंद्र, प्लॉट नंबर ७९, सर्व्हे नंबर ९८, भुसारी कॉलनी, कोथरुड, पुणे - ४११ ०३८
टेलिफोन : ०२०-५२८ ६१०५ chaitanyalaharipune@ rediffmail.com

# ....तुझा विसर न व्हावा.......

समस्त मानवजातीचे परिवर्तन होऊन या पृथ्वीवरच परमेश्वरी साम्राज्याचे नंदनवन निर्माण व्हावे हेच प.पू.श्रीमाताजींचे स्वप्न आहे. त्यासाठींच सहजयोगाचे महाशक्तिशाली आयुध धारण करून आदिशक्तीनें हे अवतरण घेतले आहे. आपण सर्व सहजयोगी या कार्याचे पाईक आहोत ही जाणीव व भावना आपल्यामधें सतत जागृत ठेऊन कृतिशील होणे ही आपली प्राथमिक जबाबदारी आहे.

श्रीमाताजी अनेकवेळा सांगतात की सहजयोग नुसता घेऊन पुरेसा नाहीं तर प्रत्येकजण सहजयोगी म्हणून घडला पाहिजे. अर्थात त्याचा प्रकाश व प्रभाव सहजयोग्यांच्या संपूर्ण व्यक्तिमत्वांतून, व्यवहारांतून, आपापसांतील संबंधांमधून सतत व्यक्त झाला पाहिजे. आपल्याला संत हे नांव तेवढयासाठीच त्या देतात व त्या पदवीचा आपल्याकडून गौरव झाला पाहिजे. श्रीमाताजींच्या अमृतवाणीचें सतत चिंतन व मनन करत राहून आपल्या रोजच्या साध्या सुध्या व्यवहारामधें वा वागण्याबोलण्यामधें त्याचा संबंध जोडत राहिल्यास श्रीमाताजींचा उपदेश आपल्या अंतर्मनामधें रुजतो.

तसें पाहिले तर आपण मानव म्हणून अपूर्णच आहोत व आपल्याला पूर्णत्वाकडे वाटचाल करत राहिले पाहिजे. समर्थांनीसुध्दा ' अचपळ मन माझे नावरे आवरीता' अशी करूणामय प्रार्थना केली. पण प्रयत्न आपल्यालाच करायचा आहे व तो सतत, जाणीवपूर्वक केला पाहिजे. मानव समाजाचे परिवर्तन हा डिव्हाईन (Divine)संकल्प आहे व साक्षात् आदिशक्तीकडूनच तो कार्यान्वित झाला असल्यामुळें पार पाडणारच आहे. खारीचा वाटा म्हणून आपण प्रत्येकानें श्रीमाताजींच्या उपदेशाप्रमाणें स्वत:ला घडवून कार्यरत झाले पाहिजे आपल्यामागें शक्ति आहेच.

म्हणूनच ''तुझा विसर न व्हावा'' ही भावना बाळगून उन्नतीचा ध्यास घेऊं या.

# दिवाळी पूजा

## प.पू.श्रीमाताजी निर्मलादेवींचे भाषण २००३

तुमच्या हृदयांत आलेला प्रकाश तेजस्वी होऊन सगळीकडे पसरणार आहे आणि त्यामुळेंच जगभरातील परिस्थिति सुधारणार आहे. आजचा हा दिवस मोठ्या आनंदाचा आहे आणि त्यांत सहभागी होणारे हाच आनंद सगळीकडे पसरवणार आहेत. सर्व प्रकारचे प्रश्न असणारच. पण आपण प्रकाशांत असल्यामुळे आपल्याला कसल्याच समस्या नाहींत, आपल्याला कुठेंच अंधार दिसत नाहीं, आपल्यासाठी सगळीकडे प्रकाशच प्रकाश आहे.

मग काय कमी पडत असेल तर आपली श्रध्दा. आपण प्रत्येकानें स्वत:शी प्रामाणिक राहिले पाहिजे. आपल्यामधील आनंद व प्रेम उसने आणलेले नसावे; ते हृदयांतून उत्स्फूर्तपणें प्रकट व्हावे आणि त्याचा आविष्कार सतत सदोदित होत रहावा. हे घटित झाले पाहिजे. असे प्रेमाचे झरे वाहूं लागले की आपल्या मधील हेवे-दावे, आकस, स्पर्धा अशा प्रकारच्या आपल्या उन्नतीच्या आड येणाऱ्या क्षुद्र भावना त्या प्रवाहामधें विरघळून जातील. तुमचे हृदय प्रेमाने ओतप्रोत भरलेले असेल तरच हे शक्य आहे.

आजचा शुभदिवस या प्रेमाचा प्रकाश पसरवणारा आहे; त्यामुळेच सर्वजण प्रकाशांत येऊन व आपले छोटे-मोठे प्रश्न विसरून समाधानांत राहतील. तुम्हाला हा हॉल पूजेसाठी मिळाला ही चांगली गोष्ट आहे आणि त्यांतून हेच जाणवते की तुम्हाला मार्गदर्शन व मदत करणारी एक शक्ति आपल्यामागे आहे हे पक्के ध्यानांत घ्या. तुम्हाला सर्व आशीर्वाद मिळाले आहेतच; त्याबद्दल शंकाच नाहीं. म्हणून आपल्या छोट्या -छोट्या गोष्टींची काळजी करत बसू नका; सर्व कांहीं त्या परमशक्तीवर सोपवलेत की सगळं कार्यान्वित होणार आहे ही श्रध्दा बाळगा. ही फार महान शक्ति आहे आणि तीच तुम्हाला खूप पुढें घेऊन जाणार आहे. आजच्या या दिवाळीचे हेच तुम्हाला वचन आहे की तुम्ही जीवनांत अत्युच्च व भव्य असे मिळवणार आहात. माझा प्रत्येक शब्द खराच ठरणार आहे. तुमचे सर्व लहान-सहान प्रश्न सुटणार आहेत; पैसा, नोकरी अशा क्षुल्लक गोष्टींची काळजी सोडून द्या. या सर्व अडचणींमधून परमात्म्याचे कांही हेतू असतात ते ओळखण्याचा प्रयत्न करा. शेवटीं तोच करता-करविता असल्यामुळें त्याच्या इच्छेनुसार सर्व कांही घटित होणार आहे. तुमचा सांभाळ करणारा तोच आहे ही श्रध्दा दृढ करा.

तुम्ही हे सर्व जाणाल अशी मी आशा करते आणि तुम्हाला अत्युच्च आनंद मिळो अशी प्रार्थना करते. तुम्ही सर्वांसाठी ही दिवाळी भरपूर आनंदाची ठरो हेच माझे अंत:करणापूर्वक आशीर्वाद.

-तुमच्या हृदयांतील आनंद व प्रेमाचा प्रकाश सर्वत्र पसरूं दे.



# नवरात्री पूजा - २००३

न्यू जर्सी, अमेरिका येथें नवरात्री - उत्सवाच्या ९ व्या दिवशी आटोपशीर पूजा झाल्यावर प.पू.श्रीमाताजी निर्मलादेवींनी दिलेला संदेश :

आज नवरात्रीचा ९ वा दिवस आपण साजरा करत आहोत. देवीनें पृथ्वीतलावर स्त्रियांमधील चांगले गुण नष्ट करणाऱ्या सैतानी प्रवृत्तीच्या दुष्टांचा संहार करण्यासाठीं अवतार घेतला. आपल्यामधेही असे दुष्ट प्रवृत्तींचे लोक आहेत आणि त्यांना आपण, शारीरिक नव्हे तर त्यांची मानसिकता, नष्ट केली पाहिजे. आपण अशा लोकांना आपल्यामधें का सामावून घेतो व त्यांच्या दुष्कृत्यांबद्दल काय करतो हे खरोखर विचार करण्यासारखे आहे. चांगुलपणा हीच माणसामधील महत्वाची बाब आहे हे तुम्ही लक्षांत घेतले पाहिजे. तुम्हीच जर वाईट पध्दतीनें किंवा सत्ता गाजवण्यासारखे वागलात तर तुमचाही विनाशच होणार. त्याच कार्यासाठीं देवीला पृथ्वीवर अवतरण घ्यावे लागले आणि देवींने नेहमींच त्याची ग्वाही दिली आहे.



# गौरी जन्मदिन पूजा

प.पू.श्रीमाताजी निर्मलादेवींचा संदेश, न्यूयॉर्क, १२ ऑक्टोबर २००३

आज आपण गौरीदेवीची पूजा करणार आहोत. देवीचे पृथ्वीतलावर अनेकवेळा अवतरण झाले. सज्जन लोकांना त्रास देऊन या ना त्या मार्गांनें त्यांना नष्ट करण्याच्या मागें लागलेल्या दुर्जनांचा संहार करण्यासाठीं अनेक वेळा देवीचे पृथ्वीतलावर अवतरण झाले. त्यासाठीं तिने फार परिश्रम केले म्हणून आज तिचा जन्मदिन आपण साजरा करणार आहोत.

हे सर्व तुम्हाला माहीत असल्यामुळें मला जास्त सांगायची जरूरी नाही. पण मुख्य लक्षांत घ्यायची गोष्ट म्हणजे तुमचे सर्व संकटांपासून रक्षण करण्यासाठींच तिला अवतरण घ्यावे लागले. तुम्ही देवीची पूजा करणारे असल्यामुळें तुमचे सर्वपरी संरक्षण करणें ही तिच्यासाठीं फार महत्त्वाची गोष्ट आहे. आज आपण अगदीं हृदयातून तिची पूजा करुं या, तुम्हाला ज्या लोकांनी त्रास दिला त्यांचे परिपत्य तीच करणार आहे. हेच आजच्या दिवसाचे भाग्य समजून तिच्याबद्दल ऋणी होऊं या. तुम्हाला का व कोण त्रास देतो हे बघणारी व तुमचा सांभाळ करणारी हीच देवी आहे.

आज या देवी-पूजेसाठीं सारे इथे जमलात याचे मला फार समाधान आहे. तिचे तुम्हाला सदैव आशीर्वाद मिळण्यासाठीं आपण तिच्या चरणी शरणागत होऊ या.

तुम्हा सर्वांना तुमच्या मुलाबाळांना व कुटुंबियांना परमेश्वराचें अनंत आशीर्वाद.

●●●



# सहजयोग्यांची प्रगल्भता

नववर्षाचा प.पू.श्रीमाताजींचा संदेश (संक्षिप्त) १९८२

सहजयोग घेतल्यानंतर पूर्णतया प्रगल्भ सहजयोगी बनण्याचा सातत्याने प्रयत्न करत रहा.

प्रत्येक नवीन वर्ष हा सहजयोग्यांसाठी एक नवा काळ, नवीन उमंग असते; कारण सहजयोगी नेहमीं वर्तमानात रहात असतो. तो भूतकाळाचा व भविष्य काळाचा विचार करत नाहीं; प्रत्येक क्षण तो जागृत असतो. सहजयोग करणें हे सागराच्या लाटांवर तरंगत राहण्यासारखे आहे. सागराच्या पाण्यावर उठणारी प्रत्येक लाट नवीन असते त्याप्रमाणें सहजयोगी जीवनांत सतत आनंद व शांतीच्या तरंगांचा उपभोग घेत असतो. मुख्य गोष्ट एवढीच म्हणावीशी वाटते की सहजयोगांत येऊन आपण त्याच्या तरंग - लहरींवर आरूढ होण्यास शिकलो का नाहीं हे महत्वाचे आहे. हे जो सहजयोगातून शिकला तोच त्याच्या आनंद सागरात उतरला. सहजयोगांत म्हटला तर दोष (त्रुटी) एवढयाच आहेत की <u>सहजयोग घेतल्यावर माणसाला सहजयोगी बनावे (घडावे) लागते; त्याशिवाय सहजयोग घेण्याचा फायदा नाहीं</u>. आईने तुम्हाला सहजयोगाच्या सागरावर तरंगणे शिकवले पण आतां तुम्ही इतरांना तसे शिकवण्याची जास्त गरज आहे. म्हणजेच दुसऱ्यांना वाचवण्याचे काम आतां तुमचे आहे हे लक्षांत घ्या. त्यासाठीं सहजयोगांत तुम्ही पूर्णतया परिपक्व झाले पाहिजे. एवढी एकच त्रुटि सहजयोगांत आहे.

पूर्वीच्या गुरुंजवळ अशी कमतरता नव्हती; कारण ते तुम्हाला शांति व आनंदाची अनुभूती देण्याआधी तुमच्याकडून खडतर तपस्या करून घेत, देहकष्ट करायला भाग पाडत आणि त्याद्वारे तुमचें मन शुध्द करून घेत, प्रदीर्घ काळ अशी तपश्चर्या व कष्ट केल्यावरच परमात्म्याला ओळखण्याची पात्रता शिष्यांना मिळत होती. पण <u>तुमच्या आईची व्यवस्था वेगळींच आहे, ती तुम्हाला सुरवातीलाच चैतन्याची अनुभूति देते</u>, परमात्मा व सत्य प्रथम जाणा व मग त्याच्यावर विश्वास ठेवा अशी तिने व्यवस्था केली आहे. म्हणून तुम्ही थोडीशी जरी मेहनत घेतलीत तर खूप मोठे कार्य होणार आहे. पोहण्याला शिकवण्याची एक तऱ्हा म्हणजे हात-पाय कसे मारायचे, पाण्यावर कसं तरंगत रहायचे हे सर्व जमिनीवरच सांगून करुन घ्यायचे; दुसरी तऱ्हा म्हणजे शिकणाऱ्याला सरळ ढकलून पाण्यांत पाडायचे. सहजयोग तुम्हाला दुसऱ्या तऱ्हेने मिळाला आहे. म्हणून थोडीशी मेहनत करून <u>तुम्हाला स्वतःला त्यांत 'सहजयोगी' बनायचे आहे.</u> सहजयोगाचा आनंदाचा अनुभव पूर्ण समाधान देणारा आहे. तुमची इच्छा शुध्द असल्यामुळें आणि कुंडलिनी शुध्द - इच्छा-स्वरूप असल्यामुळें तुम्हाला तात्काळ अनुभूति मिळाली.

शुध्द इच्छा पुरी झाल्यामुळें तुमच्या इतर इच्छाच संपल्या आणि तुम्हाला समाधान मिळाले. ज्याच्या मनांत असमाधानाचा लवलेशही नाहीं तो खरा सहजयोगी. थोडेसे जरी असमाधान शिल्लक राहिलेअसेल तर समजा की कुंडलिनी नीट जागृत झाली नाहीं. त्या स्थितीमधेही तुम्हाला आशीर्वाद मिळत राहतात. परमचैतन्याचे चमत्कार आढळतात व तुम्ही हळु-हळु अग्रेसर बनत जाता.

सहजयोग्याला मिळालेला विशेष आशीर्वाद म्हणजे तो उदार अंत:करणाचा बनतो; त्याला दुसऱ्याला देण्याची दानत मिळते. त्यांतून मिळणारा आनंद असा खास आहे की, प्रापंचिक कसल्याही वस्तूपासून तो मिळण्यासारखा नाहीं. आणखी एक विशेष आशीर्वाद म्हणजे तुमच्यातील गुरु-तत्त्व जागृत होते आणि तुम्ही दुसऱ्यांची कुंडलिनी जागृत करूं शकता. ही क्षमता आली की समजा आईचे काम संपले व तुमचे काम सुरु झाले. हे जोपर्यंत जमत नाहीं तोपर्यंत मेहनतपूर्वक ध्यान करायला हवे. हा एकच वर म्हटल्याप्रमाणें सहजयोगात दोष आहे. माझ्या बाजूने एक माता म्हणून प्रयत्न करण्यांत मी कांहीं कसूर ठेवत नाहीं; माझ्याकडून कांहीं कमी पडल्यास माझ्या मुलांत कांही कमतरता राहील म्हणून मी खूप काळजी घेत असते. पण तुमची प्रत्येकाची तपस्या तितकीच जरुरीची आहे कारण त्याशिवाय कार्य सफल होणार नाहीं. पण ही तपस्याही कसल्याही प्रकारे कठीण किंवा खडतर नाहीं; शांतपणें सर्व कांही घडेल.

पहिली गोष्ट म्हणजे सहजयोग्यांनी प्रेम करायला शिकले पाहिजे. माझ्या कानावर जेव्हां कधीं एखाद्या सहजयोग्याबद्दल, तो कुटुंबातील माणसांना नीट वागवीत नाहीं वा मारझोड करतो वा मुलांवर नीट लक्ष ठेवत नाहीं वगैरे, येते तेव्हां मला नवल वाटते; कारण सहजयोगामधें तुमच्या मनांत प्रेमाची भावना अनायासपणे येते व वृध्दिंगत होते. तसे नसेल होत तर सहजयोग करण्याचा काय फायदा ? तुम्ही सहजयोगांत आल्यावर वृक्षासारखे होता, वृक्षाच्या छायेखाली कुणीही आला तरी तो ऊनपावसापासून त्याचे संरक्षण करतो ना ? मग तुमच्या छायेखाली असलेल्यांबरोबरचे तुमचे संबंध प्रेमाचे व आस्थेचे असलेच पाहिजे. हे तुम्हा सगळ्यांसाठी मी सांगत आहे, कुणाला वाटेल मी कुणा विशिष्ट माणसाला उद्देशून बोलत आहे तर ती चुकीची समजूत आहे; हे सगळ्यांना लागूं आहे. मग भले असे दुसरे लोक वा कुटुंबातील नातलग सहजयोगांत नसले तरी तुम्ही सहजयोगी म्हणून त्यांच्याशी प्रेमपूर्वकच वागले पाहिजे. कुणाच्या मागे हात धुऊन लागल्यवरच तो सहजयोग घेईल असे समजणे ही मोठी चूक आहे. सहजयोगी म्हणून तुमच्या वागण्या बोलण्याने प्रभावी होऊनच दुसरे सहजयोगांत येणार आहेत. जबरदस्ती करून कुणाला सहजयोगांत आणता येत नाहीं कारण प्रत्येकाला त्याच्या पूर्ण स्वतंत्रतेतच सहजयोग मिळायला हवा.


तुम्ही जसे सहजयोगामधून घडत आहात तसे दुसरे अनेक लोक आहेत व त्यांची दृष्टि तुमच्याकडे आहे हे लक्षांत घ्या. तुम्ही कसे घडत गेला ही वेगळी गोष्ट . समजा तुमचे कुणी दुसरे गुरु आहेत, साक्षात्कारी असतीलही, तरी ते स्वत: मेहनत घेऊन तुम्हाला वर आणायचा प्रयत्न करतात; आज ना उद्यां तुम्ही ठिकाणावर याल म्हणून स्वत: कष्ट करतात; पण तुमच्या आईची गोष्ट वेगळी आहे, तिला तुम्हा प्रत्येकाला गुरु बनवायचे आहे. हे काम कठीणच आहे म्हणा. तसे तुम्ही हळु-हळु बनतच आहांत. पण म्हणूनच स्वत: घडत जात असतांना तुम्ही इतरांचा विचार करा. आपले शेजारी-पाजारी, आजूबाजूचे अशा सर्वांचा विचार करा. त्यांना सतत क्षमा करत जा व त्यांच्याबद्दल सहानुभूति बाळगा. क्षमा हेच तुमचे सर्वांत शक्तिशाली साधन व आयुध आहे; त्याचा उपयोग केला नाहीं तर त्याच्यासारखे दुसरे आयुध या कलियुगांत तुम्हाला मिळणार नाहीं. क्षमादृष्टीनेंच लोकांकडे पहावे, जिथे क्षमा असते तिथेच

<u>शांति नांदते</u>; क्षमेशिवाय शांति मिळणार नाहीं. म्हणून दुसऱ्याला नेहमी क्षमा करा आणि त्याचबरोबर स्वतःलाही क्षमा करा. हे करत राहिलात तर स्वतःमधे आपोआपच शांति आल्याचे तुम्हाला जाणवेल. असे केल्यानेच आज्ञा चक्र उघडणार आहे.

आतां आणखी एक गोष्ट. <u>सहजयोगांत परिपक्क्व होण्यासाठीं तुम्ही स्वतःला एक प्रकारची शिस्त लावली पाहिजे</u>. पुष्कळ लोकांना 'मला वेळ मिळत नाहीं' असे म्हणण्याची संवय असते. ही एक सबब झाली; तुम्ही सर्व तुमच्या अडचणी सोडवण्यासाठीं माझी मदत मागता तेव्हां मी जर म्हणाले ' मला वेळ नाहीं' तर!. पण मी तुम्हाला भेटले, न भेटले तरी तुमच्यासाठीं मला नेहमीच वेळ सापडतो. तुम्हाला तुमच्यासाठींच काम (मेहनत)करायची असल्यामुळें वेळ व शिस्त तुम्ही लावलीच पाहिजे. नाहीं तर तुम्ही नियंत्रण सुटलेल्या कार सारखे कुठे जाल वा खड्डयात पडाल याचा भरवसा नाहीं. त्यासाठीं फक्त स्वतःकडे पहा; तुमच्यामधील इच्छाशक्ति व कार्यशक्तिकडे लक्ष द्या; इच्छा शुद्ध झाली की आत्म्याशी एकाकार होण्याची इच्छा बळावते, बाकी साऱ्या भौतिक इच्छा सोडून द्या. क्रियाशक्ति बळकट होण्यासाठी जे काय करायचे ते सहजभावांत करा; सहज म्हणजे आपण हातपाय न हालवतां सर्व कांही होईल असें समजणे नाहीं, साध्या बीजाला अंकुर फुटतो ही प्रक्रिया नीट पाहिली तर लक्षांत येते की तो फुटलेला यकःश्चित अंकुर बाहेर पडण्यासाठी व वाटेतील माती-दगडांना वळसा घालून डोके वर काढण्यासाठीं धडपड करत असतो व पोषणासाठीं पाण्याचा आसरा व ओलावा मिळेल तिकडे वळत राहतो. <u>सहजयोग्यांनी जीवनामधें ही सूझ-बूज वापरली पाहिजे;</u> अशी समझदारी मिळवणे हेच ध्येय व जबाबदारी आहे हे ओळखा. समझदार माणूस संयमी असतो, छोट्या छोट्या गोष्टींवर चिडचीड करत नाहीं, सारखे दोष व चुका काढत नाहीं असे होणें हे परिपक्वतेचे लक्षण आहे. जो सहजयोगी असा परिपक्व (mature) होत नाहीं तो सहजयोगाला लायक नाहीं, म्हणून <u>समझदार व परिपक्व बनण्याचा प्रयत्न करत रहा. असे झालात तर तुमच्या आईला आनंद होणार आहे</u>, नाहींतर लोक म्हणतील आईने तुम्हाला कांही शिकवले नाहीं. म्हणून समझदार व प्रगल्भ बनण्याकडे नीट लक्ष द्या, एवढेच नाहीं तर ती तुमची जबाबदारी समजा.

आजच्या या नववर्षाच्या शुभदिवशी तुम्ही परिपक्व सहजयोगी बनण्याचा निश्चय करा. सहजयोगात नवीन-नवीन लोक येत राहतात, कुणाला कमी-जास्त व्हायब्रेशन्स असतात, कुणाला कांही त्रास, अडचणी असतात, म्हणून सर्वांना सांभाळण्याचा मोठेपणा(बढाई नाही) तुमच्यामधें दिसला पाहिजे. त्यामधें कसला अधिकार नसतो तर पितृत्व-मातृत्वाची भावना आली पाहिजे. जशी मी तुम्हाला प्रेमाने सांभाळते तसे त्यांना प्रेमाने आपले म्हणा. हा प्रेमभाव तुमचा सरल-सहज स्वभाव झाला पाहिजे. तुम्हा सर्वांवर माझा विश्वास आहे. 'योग-क्षेम वहाम्यहम' या परमात्म्याच्या वचनाप्रमाणें तुमची सर्व जबाबदारी मी घेतली आहे. म्हणून आजकालच्या कठीण व दूषित वातावरणातही तुम्ही स्वतःची जबाबदारी ओळखून उत्तम सहजयोगी बनण्याचा सतत प्रयत्न करा. हाच माझा नववर्षाचा संदेश आहे.

सर्वांना अनंत आशीर्वाद





# सहजयोगात परिपक्व व्हा

प.पू. श्रीमाताजी निर्मलादेवींचे प्रवचन

सतत बाहेर धांवणारे चित्त जागृतपणें रोखून स्थिर करण्याची ओढ लागली पाहिजे.

(प्रवचनाच्या आरंभी रे. टिळक यांनी लिहिलेले 'भय काय प्रभू ज्याचा रे' हे भजन झाले. भजन ऐकताना श्रीमाताजींना अगदी भरून आले. त्या अर्थमय काव्याचा अर्थ समजावताना श्रीमाताजींनी सांगितले की जो परमात्म्याशी एकाकार झाला आहे तो या भौतिक जगताच्या पलीकडे पोचलेला असल्यामुळें त्याला कसलीच भीति उरत नाहीं, नैराश्य येत नाहीं आणि त्याच्या सर्व भौतिक समस्या संपतात; खरा सहजयोगी असा असतो)

आज मी प्रज्ञा (New Awareness) बद्दल तुम्हाला सांगणार आहे. ही प्रज्ञा ध्यान, ध्यानामधील धारणा व समाधी अवस्थेनंतर जागृत होते. फळ पिकल्यावरच त्याला चव व गोडी येते त्याप्रमाणे हे घटित होते, मगच तुम्हाला परमात्म्याच्या परमचैतन्य-शक्तीची लीला निसर्गामधून समजून येते. प्रत्येक सहजयोग्याने ही स्थिति मिळवली पाहिजे. ही फार महत्त्वाची गोष्ट आहे. सहजयोगांत नुसते काठा-काठावर राहणे धोकादायक असते. ही स्थिति मिळवल्यानंतर परमचैतन्याचे आशीर्वाद तुम्हाला समजतात आणि तुम्ही खऱ्या अर्थाने परमेश्वराच्या साम्राज्यांत उतरता. मग तुम्हाला सर्व मदत, संरक्षण व मार्गदर्शन मिळते आणि भौतिक, आर्थिक, मानसिक, परस्पर संबंध अशा सर्व प्रकारच्या समस्या सुटतात. कारण सूर्य-चंद्रापासून पंचमहाभूतेही तुम्हाला सदैव मदत करत असतात. सर्व सहजयोग्यांनी या स्थितीवर येणे आवश्यक आहे कारण इथूनच उन्नतीच्या पुढच्या टप्प्यावर तुम्ही पोचूं शकणार आहांत.

ही स्थिति कशी मिळवायची हा बऱ्याच जणांना प्रश्न पडतो. सर्व प्रथम हे ठामपणे समजून घ्या की तुम्ही फार भाग्यवान साधक आहांत. पूर्वीच्या साधकांसारखे तुम्हाला कष्ट - सायास पडले नाहींत. पूर्वी कांही साधक जप-जाप्य करत, कांही नाचत-गाजत हातवारे करत जयघोष करत, पण अशामुळें चित्त अस्थिर व डळमळीत होऊन बरेच जण डाव्या बाजूकडे गेले. दुसरा प्रकार महत्वाकांक्षेने भारलेले आणि आपल्याच हाती सत्ता एकवटण्याच्या मागे लागलेले हिटलरसारख्या प्रवृत्तीचे लोक जे उजव्या बाजूच्या लोकांचा गैरफायदा

घेऊन फक्त अराजक माजवतात. ख्रिश्चन वा इस्लाम धर्माचे धर्मविडे नेते देवाच्या नांवाखाली तंटे - बखेडे, वैरभाव माजवतात. पण तुम्हा लोकांना आत्मसाक्षात्कार मिळाला आहे म्हणून तुम्ही मधोमधच राहिले पाहिजे. 'स्व' त:च्या पलीकडे उन्नत न झालेल्यांची हीच अडचण असते. म्हणून ध्यान करतांना धारणा करीत सातत्याने ध्यानांत उतरण्याचा प्रयत्न करा. मगच समाधी स्थितीवर परमात्म्याच्या आशीर्वादाच्या आनंदाचा अनुभव तुम्हाला जाणवेल. ह्या स्थितीतच आपण आत्मा असल्याचा साक्षात अनुभव मिळणार असतो. आत्म्यावर जाणीव व धारणापूर्वक चित्त स्थिरावले की या आनंदाचे तुम्ही साक्षी बनता.

सहजयोगी लोक वेगवेगळ्या प्रवृत्तीचे असतात. इथे आलेले कांहीं जण आपल्या व आपल्या कुटुंबाच्या राहण्याच्या सोयी, आपल्यासाठी वेगळी व्यवस्थ, सोयी इ. मधेच व्यस्त असतात. कांही उगीच गप्पा, हसण्याखिदळण्यांत रमलेले असतात. प्रामाणिकपणे स्वत:कडे पाहिलंत- सहजयोग प्रामाणिक माणसांसाठी आहे- तर हे तुमच्या लक्षांत येईल. इथे तुम्ही ध्यानासाठी आलेले आहांत, आजकालच्या गतिमान जीवनामधें तर ध्यानामधें गहनता वाढवण्यासाठीं आपण इथें आलो आहोत हे विसरून चालणार नाहीं व तोच मुख्य उद्देश तुमचा असला पाहिजे. हे फार आवश्यक आहे. त्यातूनच शांतीचा खरा अर्थ तुम्हाला समजेल. म्हणून अंतर्बाह्य शांति प्रस्थापित झाली पाहिजे. त्या बाबतीत ऑस्ट्रेलियातील आश्रम आदर्श आहेत; त्यांच्या आश्रमांत मी दहा-पंधरा दिवस राहिलेली आहे. पण मला कधीं कुणाच्या चालण्याचाही आवाज वा हालचाल ऐकूं आली नाहीं. या शांतिमधेच तुमचे चित्त स्थिर होत असते.

माझ्या देखतही काय व किती बोलायचे याचे भान तुम्हाला हवे व आपण कुणासमोर आहोत याचे भान सदैव जागृत असले पाहिजे. मला तुमच्या कडून कांहीं नको असते पण माझ्याकडून तुम्ही काय मिळवणार इकडे तुमचे लक्ष असले पाहिजे. माझ्या उपस्थितीत असणें हा फार अमोल काळ आहे ही भावना तीव्रपणें तुमच्या हृदयांत उतरली पाहिजे. तुम्ही एकत्र येता तो फार महत्त्वाचा काळ असतो व मी तुमच्यासमोर असते तो त्या महत्त्वाच्या काळांतील सर्वांत जास्त महत्त्वाचा समय असतो हे ध्यानांत घ्या. त्याचा पुरेपुर फायदा तुम्ही मिळवला पाहिजे. जे माझ्याबरोबर राहतात, माझी कामे करतात, माझ्याशी प्रत्यक्ष बोलतात ते स्वत:ला कधी कधीं फार मोठे समजूं लागतात. ते असू दे, पण जे मुळांत शहाणे असतात ते स्वत:चा खरा फायदा करून घेतात. आंतरिक परिपक्कता मिळवणे हा मोठा फायदा आहे व त्या दृष्टीने तुम्ही जितका प्रयत्न कराल तितका तुमच्याच हिताचा आहे. ही स्थिति ज्याने मिळवली त्याला ऊन-पावसाबद्दलही कांहीं वाटत नाहीं; मला काय मिळवायचे आहे हे ध्येय ठामपणे बाळगल्यावर इतर कसल्याही गोष्टी त्याच्या मनांत येत नाहींत. कांहीं जण माझ्या दृष्टीसमोर असतात, कांहीं मला पाहूं शकतात तर काहींना माझे दर्शनही होत नाहीं. हे सर्व गौण आहे. आपल्याला उत्तरोत्तर, अधिकाधिक उच्च स्थिति मिळवायची आहे याची तुम्हाला सतत ओढ हवी.

आतां आपल्या चित्तावर ताबा कसा मिळवायचा? परमात्माचे कार्य एखाद्या बॅलन्ससारखे सूक्ष्म व संतुलनात चाललेले असते.पण कांही लोकांचे

चित्त स्वत:चीच फसवणूक केल्यासारखे चालते; असे लोक प्रत्येक बाबतीमधें आपला काय फायदा होणार आहे तेच पाहतात, किंवा आपला पैसा किंवा वेळ कशाने वाचेल इकडे पहात रहातात.खरें तर प्रत्येक गोष्ट पैसा,श्रम किंवा वेळ एवढ्याच फालतू दृष्टिकोनातून न पहाता सहजपणें केली पाहिजे. या संवयीमुळें तुमचीच चित्त-शक्ति प्रकाशित असूनही वाया जाते आणि त्याचा अपव्यय होतो. हा अपव्यय टाळून ती शक्ति वाचवली पाहिजे. तुम्ही सर्वसाधारण माणसे नाहींत तर सहजयोगी आहांत. म्हणून फालतू गोष्टींबद्दल काळजी न करता मी दुसऱ्याला काय मदत करुं शकतो, दुसऱ्यासाठीं माझा वेळ व पैसा कसा देऊं शकतो हा विचार करुन आपले हृदय उघडा.

माझ्या प्रवचनात सुध्दा कांहीं जण माझे बोलणें एकाग्रतेनें पूर्णवेळ ऐकतात, कांही जणांचे लक्ष मधे-मधें दुसरीकडे वळते तर काही जण थोडा वेळ लागला की कंटाळतात वा सारखे इकडे-तिकडे पहात राहतात. <u>खरं तर आपले चित्त किती स्थिर होत आहे व स्थिर राहते इकडेच सहजयोग्यांचे लक्ष पाहिजे</u>. एकाग्रतेमधूनच चित्त स्थिर होते. माझ्या फोटोवर लक्ष केंद्रित करणें सर्वांत चांगले; हे करताना मला समरसतेनें हृदयांत साठवण्याचा प्रयत्न करावा. सहजयोगाचाच विचार करत राहिल्यानेही चित्त ताब्यांत येते.

निगेटिव्ह विचार करणाऱ्या लोकांचे चित्त फार बिघडलेले असते. त्यांना दुर्घटना, अपघात,दैवदुर्विलास अशा घटना आकर्षित करतात. वर्तमानपत्रातल्या तसल्या बातम्यांत त्यांना रस असतोच पण स्वत:च्या बाबतीत घडणाऱ्या मामुली अडचणींचेही ते स्तोम माजवतात. त्यामुळें त्यांच्या वागण्या-बोलण्यांतही निराशावादी भावना व्यक्त होत राहतात. स्वत:च्याच प्रॉब्लेममधें गुंग असलेल्या लोकांना सतत तडजोड करावी लागते; सहजयोगांत कसलीही तडजोड नसते. हिरा हा नेहमीं हिराच असतो. त्याचे तेज कुणी हिरावून घेत नाहीं. सहजयोग तसाच व्यक्त होणारा आहे. म्हणून भीति, असुरक्षितता, दु:ख अशा भावनांमधें न अडकता त्यांच्याकडे आरशासारखे पहात चला म्हणजे त्यांचाच अविष्कार करण्यामधें आपले चित्त अडकल्याचे तुमच्या लक्षांत येईल.भावनिक विचारांमुळें चित्त बिघडण्याचे हे दुसरे कारण.

तिसरा प्रकार म्हणजे चित्रविचित्र वागणारे (idiotic) व बेअक्कल (Stupid) लोक. वर वर्णन केलेल्या तऱ्हांचा हा परिणाम आहे व अशा लोकांची गणना 'मूर्ख' या शब्दांतच असे केल्याने तुमचे चित्त व त्याची ऊर्जा आत्म्याकडे वळवण्यास मदत होते. असे लोक परमचैतन्याच्या कार्याचे वाहक बनतात. तसे कांही लोक व्यवसाय,कुटुंब,नोकरी, घर इ.च्या मार्गेच धावणारे असतात; त्यांचे सारे लक्ष, सारा विचार त्यांच्याच बद्दल असतात. अशा लोकांचे चित्त प्लास्टिकसारखे जड होऊन जाते आणि जीवनांतील साऱ्या आनंदाला ते पारखे होतात. इस्लाम-ख्रिश्चन धर्मप्रसाराच्या मागे असणारे लोकही सर्व शक्ति त्याच कार्यामधें खर्च करतात; त्यांचाही हाच प्राब्लेम आहे. असे चित्त सूक्ष्मतेमधें उतरत नाहीं. प्रकाशित चित्त (enlightened attention) व्यक्तीला जबाबदारी व क्षमता याची योग्य जाणिव देते. सहजयोगामधून चित्त <u>अत्यंत सूक्ष्म व जाणीवेच्या खोल स्तरापर्यंत पोचणारे असे टोकदार झाले (penetrating)</u>

पाहिजे.


सहजयोगामधें हे सर्व तुम्हाला स्वत:च्या अनुभवामधून शिकायचे आहे. केवळ मी म्हणते ते शब्द साठवून उपयोग नाही तर ते प्रत्यक्ष अनुभवांत उतरले पाहिजे. शिक्षण व अनुभव ह्या सतत चालणाऱ्या प्रक्रिया असल्यामुळें त्यांतूनच चित्त अधिकाधिक शांत, स्थिर झाल्यावर प्रज्ञेचा उगम होतो. म्हणूनच जाणीवपूर्वक व धारणापूर्वक ध्यानामधून समाधि स्थितीपर्यंत पोचले पाहिजे. सतत आपल्याच चित्ताकडे लक्ष ठेवा; पैसा, रस्त्यावर गाडी चालवणें, धंद्यातील नफा-तोटा, कुटुंबातील माणसे इ.कडे जसे तुम्ही लक्ष देता तसे स्वत:कडेही पहा; माझे चित्त कुठे आहे, मी कुठे कमी पडतो हे तपासत रहा. अशा तऱ्हेने प्रगल्भ झालेल्या योग्यांना मग कसलाच प्रश्न पडत नाहीं, तें प्रेरणादायी व उत्साही बनतात. तुमच्यासमोर प्रश्न उठतात तेव्हां आपल्यामधेंच कांहीतरी कमतरता आहे वा आपल्या यंत्रणेत (Instrument) कांही खराबी आहे ह्याची जाणीव ठेवा. ते ठीक झाल्यावरच सर्व कांहीं कार्यान्वित होणार आहे हे लक्षांत घ्या.

हा अभ्यास केलात व अनुभव घेत राहिलात की मगच तुमचे चित्त स्थिर होईल. कळी फुलल्यावरच त्याचे सुंदर फूल बनते व त्याचा सुगंध दरवळतो. तसे तुम्ही उमलले पाहिजे. म्हणून संत व सहजयोगी पदावर आरूढ होण्याचा ध्यास घ्या. चित्त असे प्रस्थापित करणारे तुम्ही स्वत:च आहांत; त्यासाठींच मला प्रसन्न करणें हा सोपा मार्ग आहे. मला प्रेझेंटस वगैरे देऊन प्रसन्न करण्यापेक्षां तुमच्या शुध्द चित्तानेंच मीही प्रसन्न होणार आहे. त्यासाठीं तुम्ही सतत जागरूक व सतर्क राहीले पाहिजे, ,मग तुम्ही जे कांही घाल त्यांतून तुमच्या प्रगल्भतेचाच आविष्कार प्रत्ययास येईल.

मला तुमच्याबद्दल काय वाटते हे तुम्हाला समजणार नाहीं. मला तुमच्याशिवाय आणि तुम्हाला माझ्याशिवाय अस्तित्व नाहीं; पण माझ्या मनांत तुमचे कल्याण ही एकमेव तळमळ आहे. मी जेव्हां तुम्हाला बोलते, रागावते किंवा दूर ठेवते ते सुध्दां तुमच्या कल्याणासाठींच तुम्हाला दिव्य मानव (Divine Person) बनावयाचे आहे आणि तीच माझी तळमळ आहे व तेच तुम्हाला मिळवायचे आहे.धरणीमातेला तिच्या पोटांतून अंकुर फुटलेल्या बीजाचे सुंदर फुला-फळांनी नटलेल्या लता-वृक्षांमधे झालेले रुपांतर पाहून अवर्णनीय आनंद होतो तसेच हे आहे. पण त्याच धरतीचे मानव करीत असलेल नुकसान पाहून तिचा क्रोध धरणीकंप-ज्वालामुखीमधून बाहेर पडतो. हे तिच्या प्रेमापोटीच घडत असते. पण तुमची आई फार प्रेमळ व दयाळू आहे आणि तिला क्वचितच राग येतो. पण त्यालाही खूप वेळ जावा लागतो. त्याचप्रमाणे वेळ लागला तरी स्वत:कडे लक्ष ठेऊन प्रगति करत रहा. त्यातूनच तुम्हाला समजेल की इतर लोक खाली घसरले तरी तुम्ही स्वत: उन्नतीच्या ऊच्च स्तरावर पोचलेले असाल. तरी काळजी घ्या. एवढेंच माझे सांगणे आहे.

सर्वांना अनंत आशीर्वाद.

● ● ●



# ॥ श्री गणपत्यथर्वशीर्ष ॥



(अंक ९ व १० - २००३ पासून पुढे)

श्रीगणेशांचे परब्रह्मस्वरूपाचे मंत्र सांगून झाल्यावर यापुढील मंत्रांत गणपतीच्या गुणांचे वर्णन अथर्वणऋषी करत आहेत.

मंत्र :- त्वं गुणत्रयातीत: । त्वं देहत्रयातीत: । त्वं कालत्रयातीत: । त्वं मूलाधारस्थितोसि नित्यं । त्वं शक्तित्रयात्मक: । त्वां योगिनोध्यायन्ति नित्यं ।

अर्थ :- '' तू तीनही गुणांच्या अतीत आहेस. तूं तीनही देहांच्या अतीत आहेस. तूं तीनही कालांच्या अतीत आहेस. तूं प्रत्येकाच्या 'मूलाधार चक्रा' मधें सदैव वास करीत आहेस. ( उत्पत्ति, स्थिति आणि लय) या करिता लागणाऱ्या तीनही शक्ति तुझ्याच आहेत. योगीजन सतत तुझेच ध्यान करतात.''

भावार्थ :- त्वं गुणत्रयातीत: ।समस्त प्रकृति सत्त्व,.रज, तम अशा तीन गुणांनी व्यापलेली आहे. सत्त्वगुण हा ज्ञान व सद्गुणसंपन्न जीवनदृष्टि देणारा, रजोगुण सुख-दु:ख दोन्ही देऊन कार्यप्रवृत्त करणारा, तमोगुण जडत्व आणणारा. इथें गुण हा शब्द 'पाश' या अर्थानें घ्यावा.

या गुणांना ताब्यांत ठेवण्याचा साधकानें प्रयत्न करावा हा या मंत्राचा संदेश आहे. सत्त्वगुणी साधकाने इंद्रियांना ताब्यात ठेऊन अंतर्मुख होण्याचा प्रयत्न करावा; रजोगुणी साधकाने कर्म करतांना समर्पण व फलत्यागाची भावना जपावी,तमोगुणी साधकानें सूक्ष्माकडे दृष्टि ठेवावी. ही शक्ति मिळण्यासाठीची प्रार्थना या उपमंत्रात अध्याहृत आहे. श्रीगणेश या तीनही गुणांच्या पलीकडे, गुणावर विजयी आहेत.

त्वं देहत्रयातीत : । प्रकृतीप्रमाणें मानवी देहही स्थूल, सूक्ष्म व कारण शरीर असा त्रिगुणात्मक आहे. जागृति, स्वप्न व सुषुप्ति अशा तीन अवस्थांमधे देहधारी जीवात्मा वावरतो. वासनांच्या सततच्या स्फुरणांमुळें जन्म-मृत्यु-

पुनर्जन्म हे चक्र चालत असते. वासना म्हणजे अज्ञान व अज्ञान नाहींसे ज्ञानानेच होणार. आत्मज्ञान हाच त्यावर उपाय आहे. गणपति परब्रह्म म्हणजे पूर्ण आहे अर्थात तो तीनही अवस्थांच्या पलिकडे आहे. म्हणून 'तू देहातीत आहेस' असा भाव या उपमंत्रात आहे.

त्वं कालत्रयातीत: । मानव सदैव भूत-वर्तमान-भविष्य अशा तीन काळांत वावरत असतो. सृष्टीनिर्मितीबरोबरच 'काल' जन्मास आला व सृष्टीबरोबरच तो संपणार, कार्य (घटना) घडता-घडताच ती भूतकाळांत जमा होते व त्याच्या फलाची आशा व चिंता आपल्याला भविष्यांत आणते. याला कर्मातील 'मी'पणा (अहंभाव)कारणीभूत असतो. योगामधें म्हणूनच वर्तमानांत क्षणोक्षणी राहणें महत्त्वाचे. त्यासाठींच 'निर्ममोभूत्वा' व 'निराशीभूत्वा' अशा संज्ञा गीतेमधें कर्म योग सांगताना दिल्या आहेत. हीच वर्तमानांत (विगतज्वर:-ताणरहित) राहण्याची साधना. श्रीगणेश परब्रह्मस्वरूप आहेत अर्थात कालाच्या अतीत आहेत म्हणून 'कालत्रयातीत:' असा हा उपमंत्र आहे.

'त्वं मूलाधार......' ह्या मंत्रावर सहजयोग्यांसाठी वेगळे विवेचन करण्याची जरूर नाहीं. मूलाधार -चक्राचे महत्त्व संपूर्ण चक्र-प्रणाली कार्यक्षम बनवण्यासाठीच आहे.

त्वं शक्तित्रयात्मक :...... ध्यायान्तिनित्यं' या उपमंत्रात शक्तिसाधनेच व शक्तिउपासनेचा निर्देश आहे. उत्पत्ती,स्थिति व विलय याकरिता लागणाऱ्या तीनही शक्ति परब्रह्मशक्तीमधेच आहेत. कुंडलिनी ही परब्रह्माची अव्यक्त शक्ति असल्यामुळे तिच्या जागरणानंतर विश्वशक्तीबरोबर साधक जोडला जातो. कुंडलिनी हे शिवशक्तिचेच प्रतिबिंब आहे. श्रीगणेश परब्रह्मस्वरूप असल्यामुळे 'योगीजन परब्रह्मस्वरुपात (शक्तिस्वरूपांत) तुझेच सतत ध्यान करत असतात' अशा अर्थाचा हा उपमंत्र आहे.

<u>मंत्र</u> :-त्वं ब्रह्मा त्वं विष्णुस्त्वं रुद्रस्त्वमिंद्रस्त्वमग्निस्त्वं वायुस्त्वं सूर्यस्त्वं चंद्रमास्त्वं ब्रह्मभूर्भूव: स्वरोम ।

<u>अर्थ</u> :-(हे गणपते) ब्रह्मा, विष्णू,महेश तूंच आहेस. इंद्र,अग्नि, वायु तूच आहेस. तूंच ब्रह्म आहेस, भूलोक, अंतरिक्ष लोक, स्वर्ग लोक हे तीन्ही लोक तूंच आहेस. तूंच ओंकार आहेस.

<u>भावार्थ</u> :- सर्व कांहीं तूच आहेस (सर्वमिदं ब्रह्म)ही शक्तिसाधना सामान्यांकरीता सोपी व्हावी म्हणून विभूति-उपासना शास्त्रांत सांगितली आहे. ब्रह्मापासून समस्त देव-देवता, तीनही लोक व त्यातील सर्व कांही या सर्वांचा समावेश 'विभूति' या शब्दात आहे. सगळीकडे परमात्मा पहावयास शिकावे अशा अर्थाचा हा संदेश आहे. इथें ब्रह्मदेव म्हणजे सृष्टिकर्ता, विष्णु म्हणजे सृष्टिपालक, शंकर म्हणजे सृष्टिसंहारक, इंद्र म्हणजे त्रिभुवनाचे ऐश्वर्य भोगणारा, अग्नि म्हणजे यज्ञामधील हविर्द्रव्य ग्रहण करणारा, वायु म्हणजे सर्व जीवांना प्राण देणारा, सूर्य म्हणजे प्रकाश व प्रेरणा देणारा, चंद्र म्हणजे वनस्पतींना जीवन देणारा, ब्रह्म म्हणजे प्राणीमात्रातील जीवरुपी शक्ति असे अर्थ घ्यावेत या सर्वांबरोबर पृथ्वी, अंतरिक्ष, स्वर्ग व ओंकार हे सर्व तूंच (श्रीगणेश) आहेस असा एकूण भाव इथें अभिप्रेत आहे. अर्थात परब्रह्म म्हणजे ओंकार, म्हणजेच गणपति, म्हणजेच 'सर्व इदं' एवढा व्यापक भाव या उपमंत्रामधें गोवला आहे.

क्रमश:



# प.पू.श्रीमाताजी निर्मलादेवींचे प्रवचन स्वीत्झर्लंड-१९८३

वृक्षाची मुळें जीवनरस शोषून पाना-पानांपर्यंत पोचवतात. सहजयोगाचा आविष्कार समग्रपणें तुमच्या व्यक्तिमत्वातून प्रगट होऊं दे.

जरी तुम्हांला आत्म-साक्षात्कार मिळाला, तरी त्यानंतरचा काहीं काळ हा तुमच्या सहजयोगातील प्रगतीसाठी असतो. ज्याप्रमाणे धरणीमाता तुमचे पोषण करत असते पण तुम्हाला त्याची जाणीव नसते त्याप्रमाणे सहजयोगाच्या गर्भात तुम्ही एक सुंदर व्यक्तिमत्वात घडत असता, तेव्हा तुम्हाला त्या विवक्षित मर्यादेत पोहोचणे जरुर आहे जशी एखादी कळी उमलावी तशी तुम्हाला त्या (ईश्वरी) अमर्याद प्रेमाची जाणीव होत असते. लहान मुलांत हे लवकर घटीत होते कारण त्यांच्यातील सरलता, निष्पाप वृत्ती. काही व्यक्तीत सुध्दा त्यांच्या आत्म-साक्षात्कारानंतर हे लवकरच घटित झाल्याचे दिसते.

काहीं लोकात त्यांच्यातील 'अहंकाराचा' प्रवास संपलेला नसतो आणि मग ते माझ्याकडे येतात. मला दिसते कीं ते बुडबुड्यासारखे हवेत तरंगत असतात जणू धरणीमातेने फुंकर मारून निर्मिलेले सागरावरील बुडबुडे. याउलट 'प्रतिअहंकाराने' भरलेले लोकही बरेच असतात. ते त्या वाळूत मिसळून जड होतात आणि आपल्या वैयक्तिक समस्येबरोबर ते रडत असतात. पण त्यांच्यातही एक क्षण असा चमकतो की ते त्या सागराच्या अंतर्यामी(आत्म्याशी) एकरूप होतात. आणि मग त्या सागराची आनंदमयी उत्फूर्त अशी शक्ती तुमचे पोषण करत जाते, मार्गदर्शन करते आणि प्रत्येक क्षणी तुम्हाला उचलून धरते. जेव्हां तुम्ही अधिक खोलात उतरता तेव्हां शाश्वत अशा अनुभवांचे मोती तुमच्या हाताला लागतात आणि ते लोक आपल्या सुंदर काव्यातून, नृत्यातून, आनंदाच्या हास्यातून ही आनंददायी रत्ने मला अर्पित करतात.

आत्मसाक्षात्कारानंतर जरी तुमचे चित्त प्रकाशित झाले असले तरी त्यात अजून परमानंदाचा प्रकाश नसतो. तुमच्यात हे सर्व हळू हळू कार्यान्वित होतच जाते पण मला वाटते आता ते लवकरात लवकर घडावे. तुम्ही काय समर्पित करणार? ती शक्तीच तुमच्याकडे धावते आणि तुमचे पोषण करते. जसे कमळ आपल्या सुगंधाला कधीच सोडत नाही, सूर्य आपल्या तेजाला कधी सोडत नाही किंवा चंद्र आपल्या शीतलतेला कधी सोडत नाही. आपण असे समजणे म्हणजे शुध्द गाढवपणा आहे. सहजयोगाच्या दृष्टीने त्याग म्हणजे आपण आपल्या अहंकाराच्या आपणच घातलेल्या मर्यादेचा, आपल्या उथळपणाचा त्याग होय आणि यातून जे मिळवतो ते आपले स्वतःचेच

असते. जे काही त्याग करतो जे निरुपयोगी आहे ते जे परम व शाश्वत आहे यासाठीच हे अज्ञानाचे ओझे उतरवले पाहिजे.

काय करावे मला कधीकधी समजत नाही. मी करते असे कधीच मला वाटत नाही, प्रत्यक्ष मी काहीच करत नाही. यासाठी माझी प्रशंसा वाटावी असे माझे काहीच नाही. कारण निसर्गत: माझे जे गुण आहेत तसेच माझे अस्तित्व आहे. मी दुसरे काही करु शकत नाही. जे काही तुम्ही प्राप्त केले त्याचे श्रेय तुम्हांलाच आहे. स्वत:ला पहाण्यांसाठी (आत्म-दर्शन) जो आत्मसाक्षात्कार मिळविला हा सत्यप्रकाश आनंदाकडे नेहणारी मोठी गोष्ट आहे तुम्ही ती मिळविलीआहे. तुमच्या स्तुतिसाठी काव्यसुमने रचावी असे मला वाटते आणि माझ्या वृत्तीतून, ईश्वरी तत्त्वातून मी तो आनंद प्रकट करत आहे. सर्वठायी, सर्वकाळी सर्वत्र हा आनंद तुम्ही पहावा. ज्याला 'ऋतंभरा प्रज्ञा' असे संबोधतात अशी रम्य मातृ-तत्वांची जाण सदैव आमच्या चित्तात रहावी यासाठी सर्वांनी आज अगदी हृदयातून प्रार्थना करावी. म्हणजे पृथ्वीमातेच्या नैसर्गिकतेचा प्रकाश तुमच्या चित्तात येईल. ज्यायोगे निरनिराळे ऋतु दिसतात तीच ती'प्रज्ञा'होय. हे सर्वामधें घडू शकते. विशेषत: जे अहंकारापासून मुक्त असून मध्यमार्गावर असतात.

काहीं लोक'मी येथे सहजयोग प्रस्थापित करणार, की अमका, तमका, त्याकरीतां माझ्यासारख्या विशेष व्यक्तिच म्हणून माताजींना मला निवडले' अशी बढाई मारत असतात. असे समजणारा सहजयोगी असूच शकत नाही. जणू एखाद्या झाडाच्या पानाला धरून सर्व झाडावर माझा ताबा आहे असे समजणे, आणि हे त्यांच्या हातातील पान कधी सुकून नष्ट होईल हे त्याला समजत नाही. तुम्ही त्या झाडाच्या जीवनरसा सारखे गतीमान असावे जो त्या झाडाच्या मुळातून, फांद्यातून फुलांतून, फळांतून प्रवाहित होतो. केवळ त्या झाडाच्य एका पानासारखे खुळी समजून करुन घेऊ नये. स्वत:च्याच समस्येत सदा अडकलेले प्रतिअहंकारीत व्यक्तीची सहजयोगात अशीच गत होईल. केवळ झाडाच्या पानाकडे लक्ष देऊन संपुर्ण झाडाची समस्या सुटत नाही.

तुम्हाला आता त्या सूक्ष्म क्षेत्रातून असीम अशा विराट क्षेत्रात झेप घ्यायची आहे. (व्यष्टीकडून समष्टीकडे). आणि हे जेव्हां घटीत होईल तेव्हां तुमचे क्षुल्लक प्रश्न त्या समुद्राच्या भव्यतेत कुठे लुप्त होतील ते तुम्हाला कळणारसुध्दा नाही. तर त्यात तुम्ही अडकूनका ते त्या वृक्षावर सोडून द्या. त्या वृक्षाचा जीवनरस तुम्हाला या छोट्या समस्येपासून मुक्त करील. कारण तुम्ही त्या अत्यंत सूज्ञ अशा वृक्षाशी, मोठ्या धार्मिक व धारणा असणाऱ्या अशा महान वृक्षाशी महान गुरुतत्व असणाऱ्या अशा वृक्षाशी संलग्न आहात, ज्याच्या महानतेची तुम्हाला कल्पना नाही. तो तुमच्या पूर्ण सुरक्षिततेची काळजी घेतो. एखाद्या नाटकाप्रमाणे साक्षीत्व देणाऱ्या अशा वृक्षाशी तुम्ही बध्द आहात. तुम्ही त्या पूर्णत्वाचे अंश आहात याची जाणीव तो देतो. तसे तुम्ही त्या पूर्णत्वाचे अंश, अंग आहात.



म्हणून तुम्ही या प्रेममय औदार्याच्या सागरात उभे आहात. बायबलमधे या जीवनवृक्षाचे वर्णन केलेले आहे. त्यात त्याला अग्निवृक्ष असे म्हटले आहे. त्याच्याशी तुम्ही पूर्णपणे एकत्व प्राप्त केले आहे. त्याचे आशीर्वाद तुम्हांला लाभले आहेत. प्रेम दिले आहे, वेळोवेळी नकळत मार्गदर्शनही मिळत आहे. जसे वृक्षाचे पान काहीही आवाज न करता अलगत जमिनीवर पडते. त्याची शक्ती हीच तुमची ओळख, तेच तुम्ही आहात.जसा शब्दार्थ हा त्या शब्दातच असतो, चंद्रप्रकाश हा चंद्राचाच भाग आहे, सूर्यप्रकाश आणि सूर्य वेगळा नाही असे एकत्व हीच तुमची ओळख, ते समिलीकरण जो ईश्वरी प्रेमाचा प्रकाश आहे ज्यामुळे तुमच्या गहनतेतून तुम्ही मिळविलेल्या फळातून लोकांना ईश्वरीतत्त्व समजते. ज्यातून तुम्हाला चैतन्य मिळते तुम्ही कार्यक्षम होता पुण्याई देणारे महान ईश्वरी कार्य पूर्ण समाधान देते. तुम्हाला कसलाही त्याग करण्याची जरूरी नाही फक्त त्या आत्मप्रकाशात तत्पर रहा.

आपण माझ्यासाठी जे मनोरंजनाचे कार्यक्रम केलेत, त्यामुळे मी फार चकित झाले असून -आनंदित झाले आहे.

तुम्हा सर्वांना मन:पूर्वक धन्यवाद. ●●●

## तीन (३)

समस्त सृष्टीची निर्मिती 'प्रकृती' कडून झाली असल्यामुळें सर्व प्रक्रिया त्रिगुणात्मक झाल्या. विश्वाच्या या अवाढव्य पसाऱ्यामधें तीन(३) या अंकाचा संचार कसा आढळतो त्याचे कांहीं विलोभनीय उल्लेख :

| | |
|---|---|
| गुण : | सत्त्व,रज,तम |
| मानव : | सत्त्वगुणी,रजोगुणी,तमोगुणी |
| निर्मिति : | उत्पत्ति,स्थिति, विलय |
| काळ : | भूत, वर्तमान,भविष्य |
| आयुष्य : | जन्म,जीवन,मृत्यू |
| अवस्था : | जागृति, स्वप्न,सुषुप्ति |
| योग : | कर्म, ज्ञान,भक्ति |
| विश्व : | दिक्,काल,निमित्त |
| आत्मस्वरुपावर अध्यारोप : | ईश्वर, जीव, जगत् |
| साधना : | श्रवण, मनन, चिंतन |
| संतुलन : | महाकाली, महालक्ष्मी, महासरस्वती |
| सहजयोग : | ध्यान, धारणा, समाधि (एकत्रच) |
| ज्ञान : | यथार्थ,नि:संदेह, शाश्वत |
| ज्ञानप्रक्रिया : | शब्दप्रमाण, प्रत्यक्षप्रमाण,अनुमानप्रमाण |
| मानवी जीवन : | बाल्यावस्था, यौवन,वार्धक्य |
| विज्ञान : | गृहीत, पडताळणी, निष्कर्ष |
| ओम : | अ,उ,म(अधिक अर्धमात्रा) |

# गणपतीपुळे सेमिनार २००३ पूर्व तयारी हवन कार्यक्रम


या वर्षीच्या गणपतीपूळे सेमिनारची तयारी सुरु झाली असून त्याची सुरवात दरवर्षीप्रमाणे हवनाने दिनांक १७ नोव्हेंबर २००३ रोजी झाली. त्यासाठी आदल्या दोन-तीन दिवसांपासूनच सहजयोगी कार्यकर्ते तसेच कमिटीप्रमुख गणपतीपूळे सेमिनारच्या ठिकाणी जमू लागले. त्यांनी येणाऱ्या सर्व सहजयोग्यांची रहाण्याची-जेवणाची व्यवस्था केली होती. आदल्या दिवशी बरेचशे सहजयोगी सेमिनारच्या ठिकाणी जमले त्यांच्यासाठी राहण्याची तातपूरती व्यवस्था केली होती. रात्री जेवण झाल्यावर भजनाचा साधारण एक तासभर कार्यक्रम झाला.

दिनांक १७ रोजी सर्वजण लवकरच ७ च्या सुमारास समुद्रावर मीठपाण्यासाठी गेले आणि जलतत्वात सर्व चक्रे स्वच्छ करुन नाष्टा करून १०.०० च्या सुमारास हवनाच्या ठिकाणी एकत्र जमू लागले. हवनाची तयारी होईपर्यंत श्रीबागडदे आणि सहकाऱ्यांनी नमोस्तुते नमोस्तुते, श्रीमाताजी वंदू तव चरण, जय जय जननी तसेच सौ शुक्ला यांनी नमामी श्रीगणराज दयाळ, माऊलीने ठोठावले दार ही भजने म्हणून वातावरण निर्माण केले

साधारण १०.३० च्या सुमारास श्री शुक्ला यांनी सर्वांचे स्वागत केले. तसेच सर्व भारतभरातील सहजयोग्यांनी सेमिनारची पूर्व तयारी करण्यासाठी सहभाग घेण्याबाबत आवाहन केले. त्यानंतर हवनाची सुरवात झाली. श्री राजेंद्र पुगालिया यांनी हवन घेतले.हवनासाठी सर्व कमिटी प्रमुखांना बोलवले होते. सुरवातीला तीन महामंत्र, गणपती अथर्वशीर्ष, श्रीमाताजींची १०८ नावे घेतली त्यानंतर आरती झाली.



श्री राजेंद्र पुगालिया यांनी त्यांच्या भाषणात सांगितले की या वर्षी या हवनासाठी मागच्यावर्षीपेक्षाही जास्त लोक उपस्थित राहिले आहेत. गणपतीपुळे तयारीसाठी सर्व भारतातून कार्यकर्ते सहभागी झाले आहेत हे विषेश आहे. तसेच या सेमिनारसाठी या परिसरातील सर्व क्षेत्रातील लोक मदतीसाठी उभे राहिले आहेत. आज हवनासाठी मालगूण मधील अनेक मान्यवर उपस्थित असल्याचे सांगून त्यात श्री गजा पाटिल, सरपंच श्री सुनिल मेयकरजी, ग्रामपंचायत सदस्य श्री शिवाजीराव पाटिल, श्रीमती मेघा बोरकर, श्री सुधाकर वाटवे, साळवी साहेब हे उपस्थित राहिल्याबद्दल त्यांचा आभारी असल्याचे सांगितले.



सरपंच श्री सुनिल मयेकर यांनी सांगितले की, या सेमिनार साठी मी शुभेच्छा देतो तसेच माझ्याप्रमाणे सर्व मालगूण मधिल ग्रामस्त आपल्या पाठिशी आहेत याची मी खात्री देतो. तसेच हे सेमिनार यशस्वी होण्यामध्ये आमच्याकडून कसलीही अडचण येणार नाही याची मी खात्री देतो..अशा प्रकारे छोट्याशा भाषणात त्यांनी सर्व उपस्थितांची मने जिंकली.

ट्रस्टी श्री पराग राजे यांनी त्यांच्या भाषणात सांगितले की, गणपतीपूळे सेमिनारची जागा ही फार पवित्र असल्याने या ठिकाणच्या सोई -सुविधा या सेमिनारसाठीच्या सात दिवसांसाठी करताना कायम स्वरुपाच्या करण्याचा आमचा प्रयत्न आहे. जेणेकरुन पुढील काळात सर्वजगातून सहजयोगी वर्षभर केव्हाही याठीकाणी येऊ शकतील आणि चैतन्याचा आनंद घेऊ शकतील. याबाबत श्रीमाताजींनी सांगितले आहे की या ठिकाणी झुंडीच्या झुंडी लोक येतील ते लवकरच घडणार आहे. इंटरनेट वरून या जागेच्या परिसराचा फोटो घेतला असता त्यामध्ये या जागेच्या ठिकाणी तीन प्रकाशाचे ठिपके दिसले.याच ठिकाणी श्रीमाताजींनी पुर्वी एका सहजयोग्याला गणेशज्योत दाखविली होती.



सध्या बऱ्याच सुविधा करण्याचे काम चालू आहे. यावर्षी लेडीज पेंडॉलची जागा मोठी केली आहे. तसेच पाण्यासाठी अनेक सुधारणा केल्या आहेत. सुधारणा ह्या कायमस्वरुपी करण्यात येत आहेत. भविष्यात सर्वत्र मार्बल लावणे, मुझियम तयार करणे, हेल्थ सेंटर तयार करणे इ. कामे करावयाची असल्याचे सांगितले.

त्यानंतर दुपारी १२.०० च्या सुमारास श्रीबागडदे आणि सहकारी गायला बसले. त्यांनी जय जगदिश हरे, सातो जनम जो पुण्य किया है, श्री जगदंबे आई रे मेरी निर्मल माँ, हे मन गुरु शरण मे रहियो शेवटी कव्वाली 'माता का करम' सादर करताना सर्वांना अक्षरशहा नाचवले. साधारण ५०० सहजयोगी उपस्थित होते.सर्वांनी महाप्रसादाचा आनंद घेतला आणि परतीच्या प्रवासाला लागले.

# गणपती पुळ्याचा 'गणपती'



अष्टविनायका खेरीज महाराष्ट्रातील प्रसिध्द जागृत गणपतीच्या स्वयंभू स्थानांपैकी पुळ्याचा गणपती एक आहे. मुद्गलपुराणात या देवस्थानाचे माहात्म्य वर्णिलेले आहे. या देशातील चार दिशांना चार मंगलमूर्तींची महास्थाने आहेत. त्यांना द्वारदेवता अशी संज्ञा आहे. त्यापैकी कोकणपट्टीत समुद्रतीरावरील ही पश्चिम द्वारदेवता आहे.

पूर्वी मोगलाई कारकीर्दीत बाळभटजी भिडे नावाचे एक गृहस्थ सन. १६०० च्या सुमारास या वस्तीच्या ठिकाणी येऊन राहिले. बाळभटजी हे महागणेश उपासक होते. ते आल्यानंतर या गावा चे सर्व हक्क मूळ रहिवासी कासार यांनी स्वत:ला मुलबाळ नसल्याने बाळभटजींना दिले. या भटजींच्या मुळे आणखी काही ब्राम्हण कुटुंबे वस्तीवर रहायला आले. एकदा कोकणात मुसलमानांची मोठी धाड आल्यामुळे जिकडे तिकडे पळापळ झाली पण बाळभटजी तेथून हालले नाहीत. त्यांनी गणेशाची अनन्यभावाने आराधना केली. त्यावेळी श्रीगणेशाने दृष्टांत दिला की, 'मी याच ठिकाणी आहे.' मग भटजींनी ते जंगल तोडले, साफसफाई केली तेव्हा डोंगरात दोन बाजूस दोन गंडस्थळे व दंतयुक्त स्वरूप त्यांच्या दृष्टीस पडले. दृष्टांन्त झाल्याप्रमाणेच ते स्वरुप पाहून त्यांना अत्यानंद झाला . त्यांनी त्यावर एक गवती छप्पर उभारुन त्याची यथासांग पुजा -अर्चा करण्यास सुरवात केली. भारताच्या समुद्रकाठी गणेशांचे एकून आठ आवतार झाले. त्यात 'गजानन' हा अवतार लोभासुरास मारण्याकरीता नैऋत्येस म्हणजे पुळे येथे प्रकट झाला असा उल्लेख आढळतो. पुळे म्हणजे पुरण समुद्राचे वाळवंट.. या गणेशाला नवस केला असता तो नवसाला पावतो.

छत्रपती श्री शिवाजीमहाराजांनी येथे येऊन दर्शन घेतले आहे. माधवराव पेशवे व रमाबाई यांनी येथे धर्मशाळा बांधली. सरदार श्री पटवर्धन यांनी गणपतीची बारा वर्षे कडक उपासना केली त्यामुळे त्यांच्या वंशाची खूपच भरभराट झाली. सरदार पटवर्धन घराणे या गणपतीला आपले कुलस्वामी मानतात. सांगलीकरांनी सभामंडप बांधला व पाण्याची व्यवस्था केली. राजाराम महाराजांनी या देवस्थानाला देणग्या दिल्या आहेत.सध्या

गणपतीपुळे मंदिर परिसराचा जीर्णोध्दार मोठ्या प्रचंड प्रमाणावर चालू आसून सदर परिसर अत्यंत शुशोभित केला आहे.

मूर्तीला साक्षात रुप नसून ती स्वयंभू आहे. दोन पुढे आलेली गंडस्थळे, खाली नाभी व दोन दात एवढीच चिन्हे दिसतात. मूर्तीची दृष्टी बरोबर क्षितिजाच्या पातळीत आहे. मूर्तीला नेहमी शेंदूर लावलेला असतो. श्रीचा चौघडा दररोज प्रात:काळी, अस्तमानी व मध्यरात्री वाजतो. प्रत्येक सोमवारी प्रत्येक महिन्यातील शुध्द व वद्य चतुर्थीस, दिवाळी, दसरा व पाडवा व माघ महिन्यातील पाच दिवस चौघडा वाजविला जातो. श्रीमंत पटवर्धनांकडून नित्य पुजा व अनुष्ठान सुरु असते. गावातील शेंड्ये घराण्याला वर्षासन पूजेची नेमणूक करुन दिली आहे. दुपारी नैवेघ व इतर भक्तजनांकडून आलेला नैवद्य दाखविला जातो. दुपारनंतर श्रीला पोषाख घालतात. सायंकाळी धुपारती झाल्यानंतर पोषाख काढून उपाहार नैवेद्य दाखवितात. नंतर मंत्रपुष्प हो ऊन मंगलमूर्ती शयनगृहात निद्रिस्त होतात.

भाद्रपद शु. १ ते ५ पर्यंत व माघ शु. १ ते ५ पर्यंत असे दोन मुख्य उत्सव होतात. उत्सवासाठी चांदीच्या मुर्तीची स्थापना पश्चिम दरवाजाच्या दक्षिणेकडे मंडपाच्या भिंतीस टेकून पश्चिमेकडे तोंड करून करतात. देवाचे आलंकार व पोषाख पुजारी देवावर चढवतो. सकाळी १२ चा डंका होईपर्यंत देवाचा पोषाख पीतांबर नेसवून सोवळ्याचा असतो. दोन प्रहरानंतर हा पोषाख काढून धोतर -जोड नेसवून पागोटे घालून अंगावर शेला घालतात. सकाळी संस्थान महापूजा व महानैवद्य देवाला अर्पण करतात. उत्सवाकरीता हरिदासांची कीर्तने असतात. रात्री जिकडे तिकडे दीपोत्सव करतात, बैठकी घालतात व लोड ठेवतात. यावेळी आतील स्वयंभू मुर्तीला किरीट -कुंडलांसह असलेला चांदीचा मुखवटा चढवून पोषाख घालून सुशोभित करतात.नंतर आरती, मंत्रपुष्प होतो व मग किर्तनाला सुरुवात होते. मध्यरात्रीचा डंका होईपर्यंत किर्तन चालते. नंतर पुन: आरती करून देवाचा प्रसाद, पानसुपारी इ. वाटल्यावर सभा बरखास्त होते. याप्रमाणे पाच दिवस नित्य उत्सव चालतो.

शुध्द चतुर्थीच्या दिवशी सायंकाळी पालखी बाहेर काढून ती सजवतात. नंतर ४ वाजता देवाची आरती करून लहान चांदीची मूर्ती पालखीत घालण्याकरिता बाहेर आणतात व पालखीत घातल्यानंतर पुन: आरती करतात. त्यानंतर देवाचा छबिना प्रदक्षिणेकरिता निघतो. पालखी उचलण्यासाठी ब्राम्हनच लागतात. प्रदक्षिणेच्या चारही बाजूस चार द्वारदेवता आहेत. त्या प्रत्येक देवतेपुढे श्रीची पालखी ठेवतात. तेथे श्रीची पूजा - आरती होते. अशा रितीने सुमारे अर्धी प्रदक्षिणा झाली की यात्रा पूर्ण होते.छबिना देवालयाकडे परत येतो व आरती -मंत्रपुष्प होऊन प्रसाद वाटला जातो. अशा प्रकारे माघीचा उत्सव पार पडतो.

भाद्रपदीला यात्रा कमी असते. पंचमीच्या दिवशी उत्सवाची सांगता व देवाचा प्रसाद होतो. भाद्रपद चतुर्थीला प्रात:काळी डंका होताच दर्शनाकरिता आलेले सर्व ब्राम्हण सोवळ्यात गाभाऱ्यात जाऊन दर्शन घेतात. सदर गणपती हा स्वयंभू असल्यामुळेच सर्व परिसरात चैतन्य जाणवत असते.

# सहज समाचार

## पुणे सहजयोग केंद्रामार्फत मागिल वर्षभरात पुणे परिसरात व ग्रामीणभागात झालेल्या पब्लिक प्रोग्राम्सची माहिती

| अ.क्र | ठिकाण | दिनांक | संख्य |
|---|---|---|---|
| | | डिसेंबर २००२ | |
| १ | राख | १५ | १०० |
| २ | निरा | १५ | ५० |
| ३ | सदोबाची वाडी | १५ | १५० |
| ४ | कारंडे मळा | १५ | १०० |
| ५ | होळ | १५ | १२५ |
| ६ | पिंपळी | १५ | ६०० |
| | | जानेवारी २००३ | |
| ७ | पुणे जि.शिक्षण मं.(कोळवण) | ४ | ९५० |
| ८ | गुळुंचे | ५ | १२५ |
| ९ | बाबुर्डी | ५ | ६० |
| १० | तरडोली | ५ | १२५ |
| ११ | जळगांव(कप) | १२ | ३० |
| १२ | हनुमान नगर | १२ | ७० |
| १३ | शेरेवाडी | १२ | १२५ |
| १४ | डोरले वाडी | १२ | ५५० |
| १५ | दुधाणे वस्ती | १७ | १५० |
| १६ | बाबुर्डी | १९ | १५० |
| १७ | शेरेवाडी | १९ | १०० |
| १८ | म्हाडा बारामती | १९ | ६० |
| १९ | कऱ्हाडी | १९ | ३०० |
| २० | वारजे नाका | २४ | १२५ |
| २१ | सासवड | २६ | ३५० |
| २२ | हिरवे | २६ | २५० |
| २३ | चांबळी | २६ | २५० |
| | | फेब्रुवारी २००३ | |
| २४ | नीरा | २ | १५० |
| २५ | कांटेवाडी | २ | ५०० |
| २६ | मुकुंदनगर | ५ | २०० |
| २७ | साई नगर | ६ | ५० |
| २८ | वारजे | ८ | २५ |
| २९ | सासवड | ९ | ८० |
| ३० | हडकी सासवड | ९ | ३०० |
| ३१ | भिवंडी | ९ | १५० |
| ३२ | सुपा खुर्द | ९ | १५० |
| ३३ | पांडेगाव | १६ | ६५० |
| ३४ | चव्हाण वस्ती | १६ | २०० |
| ३५ | धायगुडे मळा | १६ | ८७ |
| ३६ | भवानी नगर | १६ | १५० |
| ३७ | सन्सर | १६ | ५० |
| ३८ | सासवड | १८ | ७०० |
| ३९ | कन्या शाळा | १८ | ६५० |
| ४० | वाघिरे हाय. | १८ | ६०० |
| ४१ | वाघिरे महावि. | १८ | २०० |
| ४२ | शेटे महाविद्या | २३ | ५० |
| ४३ | चिल्हे वाडी | २३ | १५० |
| ४४ | गुळुंचे | २३ | १५० |
| | | मार्च २००३ | |
| ४५ | एकदपूर | १ | १५० |
| ४६ | खानवाडी | १ | ८० |
| ४७ | नायगांव | १ | ४०० |
| ४८ | पारगांव-मेमाणे | १ | १५० |
| ४९ | कुंभार आश्रम | १ | ३०० |
| ५० | हरगुडे | ९ | १२० |
| ५१ | परिंचे | ९ | ६० |
| ५२ | यादववाडी | ९ | ६० |
| ५३ | केतकावळे | ९ | ३५० |
| ५४ | पवार वाडी | ३० | १५० |
| ५५ | काळे वाडी | ३० | ५० |
| ५६ | ढुमे वाडी | ३० | १५० |
| ५७ | देवडी | ३० | ४० |
| ५८ | पोखर | ३० | ८० |
| ५९ | नारायन पेठ | ३० | ३०० |
| ६० | दिवे | ३० | ३०० |
| | | एप्रिल २००३ | |
| ६१ | पानवाडी | ६ | २०० |
| ६२ | थोपटे वाडी | ६ | १५० |
| ६३ | कोढीत | ६ | १५० |
| ६४ | आंबोडी | ६ | १०० |
| ६५ | बांदलवाडी | ६ | ३५० |
| ६६ | काळदरी | ६ | ३५० |
| ६७ | झेंडेवाडी | १३ | २०० |
| ६८ | सोनोरी | १३ | १०० |
| ६९ | रुईगाव | १३ | १०० |
| ७० | बारामती | १३ | १०० |
| ७१ | पिंपळे | २० | ३०० |
| ७२ | पांघारे | २० | १५० |
| ७३ | सासवड | २० | १५०० |
| ७४ | खळद | २७ | १२५ |
| ७५ | चिलावडे वस्ती | २७ | १५० |
| ७६ | तक्रारवाडी | २७ | १५० |
| ७७ | सोमरडी | २७ | ३०० |
| ७८ | गराडे | २७ | १५० |
| | | मे.२००३ | |
| ७९ | शिवरी | २५ | १२५ |
| ८० | सासवड पो.ला | २५ | ५० |
| | | जुन २००३ | |
| ८१ | साकुर्डी | ६ | ७० |
| ८२ | तक्रारवाडी | ६ | १०० |
| ८३ | आस्करवाडी | ८ | २५० |
| ८४ | बोपगांव | ८ | १०० |
| ८५ | शिवाजी चौक | ८ | २५० |

| अ.क्र | ठिकाण | दिनांक | संख्य |
|---|---|---|---|
| ८६ | वनपूरी | २२ | ८० |
| ८७ | उदाची वाडी | २२ | ४०० |
| ८८ | वाघापूर | २२ | २५० |
| ८९ | क.आश्रम सासवड | २७ | ६० |
| ९० | गुरोळी हाय. | २८ | ५०० |
| ९१ | जि.प शा. गुरोळी | २८ | २०० |
| ९२ | जि.प.शा.वाघापूर | २८ | १५० |
| ९३ | जि.प.शा.सिंगापूर | २८ | २०० |
| ९४ | पार्क सासवड | २८ | ६० |
| ९५ | सिंगापूर | २९ | १५० |
| ९६ | राजेवाडी | २९ | ३०० |
| ९७ | गुरोळी | २९ | ३५० |
| | | जुलै २००३ | |
| ९८ | गुरोळी | ५ | ३०० |
| ९९ | पांडेश्वर | ६ | २५० |
| १०० | जवळ अर्जून | ६ | १५८ |
| १०१ | वाळुंज | १० | १०० |
| १०२ | पारगांव रोड | १० | १५० |
| १०३ | चौफूला | १० | ३०० |
| १०४ | पारगाव रो.हमी | १० | ३०० |
| १०५ | वौडज | १० | ८० |
| १०६ | कोळ विहिर | १० | ३०० |
| १०७ | मावडी | २७ | २०० |
| १०८ | आंबी रो.हमी१ | २७ | ३०० |
| १०९ | आंबी रो.हमी २ | २७ | ३०० |
| ११० | आंबी रो. हमी ३ | २७ | ३०० |
| १११ | नाझरे | २७ | ६० |
| | | ऑगस्ट २००३ | |
| ११२ | भोंगळे मळा | १५ | ३० |
| ११३ | इनामके मळा | १५ | ७० |
| ११४ | मोढकी | १५ | ३२२ |
| ११५ | कोथाळे | १७ | १२५ |
| ११६ | रानमळा | १७ | २५० |
| ११७ | पिलानवाडी डॅम | १७ | १२५ |
| ११८ | पिलानवाडी | १७ | ४०० |
| ११९ | मठवाडी | २१ | ७७ |
| १२० | थापेवाडी | २१ | ८२ |
| १२१ | रावडेवाडी | २१ | ५१ |
| १२२ | मल्हारवाडी | २१ | २१३ |
| १२३ | पिसुर्टी | २१ | ३५० |
| १२४ | कामठवाडी | २१ | १०० |
| १२५ | नलावडे वाडी | २४ | ३७ |
| १२६ | कवडेवाडी | २४ | ६४ |
| १२७ | शुक्ल वाडी | २४ | ७०० |
| १२८ | जुऊर | २४ | १०० |
| १२९ | आडाची वाडी | २४ | ४०० |
| | | सप्टेंबर २००३ | |
| १३० | वाल्हा | १ | १०० |
| १३१ | कोडीत खुर्द (रो.हमी) | ७ | ३५० |
| १३२ | कोडीत बुद्रुक(रो.हमी) | ४ | ८५० |
| १३३ | भिवरी | ७ | २०० |
| १३४ | मलठण | १० | ८०० |
| १३५ | मलठण प्रा.शाळा | १० | ३०० |
| १३६ | लाखेवाडी | १० | ३०० |
| १३७ | कोडीत खुर्द | १५ | २०० |
| १३८ | पुरंदर कॅालेज सासवड | १६ | १०५० |
| १३९ | कोतोबा हायस्कूल दिवे | १६ | ५६० |
| १४० | पुरंदर हाय. सासवड | १६ | १२०० |
| १४१ | इंदिरा गांधी प्रा.वि. | १६ | १५० |
| १४२ | छत्रपती शिवाजी वि. | १६ | १३० |
| १४३ | जि.प.शाळा भिवंडी | १६ | ३७५ |
| १४४ | जि.प.शाळा नारायणपूर | १६ | १४० |
| १४५ | वाघिरे वि.नारायणपूर | १६ | १५० |
| १४६ | सं. नामदेव शा.सोपननगर | | २९५ |
| १४७ | हिरवे (रो.हमी) | २१. | ४०० |
| १४८ | हिरवे (रो.हमी) | २१ | ४० |
| १४९ | पोखर | २१ | २५० |
| १५० | सूसगांव | २८ | ४०० |
| १५१ | भैरवनाथ वि.भिगवण | २९ | १५२५ |
| १५२ | आगाशे वि.श्रीपूर | २९ | १२५० |
| १५३ | श्रीपूर | २९ | ३०० |
| | | आक्टोबर २००३ | |
| १५४ | यादववाडी | २ | १५० |
| १५५ | खानापूर | ५ | ४० |
| १५६ | पळसोशी | ५ | १०० |
| १५७ | खानापूर हाय. | ५ | १०० |
| १५८ | उत्रोली | ५ | २०० |
| १५९ | पुरंदर कि.रो.ह. | १९ | १५० |
| १६० | पुरंदर कि.मि. | १९ | ३५० |
| | | नोव्हेंबर २००३ | |
| १६१ | भांबवडी | ११ | ३०० |
| १६२ | दिवळे | १६ | ७० |
| १६३ | मोहारि बुद्रुक | १६ | २२५ |
| १६४ | सणसवाडी | १६ | ६० |
| १६५ | हातवे | १६ | ६० |
| १६६ | कापूर होळ | १६५ | २०० |
| १६७ | शेटे वस्ती | २२ | ६३ |
| १६८ | नऱ्हे | २३ | १०० |
| १६९ | माळवाडी | २३ | १५० |
| १७० | संगमनेर | २३ | १५० |
| १७१ | वाघजाई नगर | २३ | ३०० |
| १७२ | भाटघर | २३ | ३०० |
| १७३ | सांगवी | २३ | १०० |
| १७४ | डी.एड कॉ.पुणे | २४ | २२५ |
| १७५ | संजय नगर | २६ | १०० |
| १७६ | आंबेघर | २६ | १५० |
| १७७ | वाल्हेवडी | २६ | १०० |
| १७८ | नसरापूर | २६ | २५ |
| १७९ | गोळेगांव | ३० | ३५० |
| १८० | तांबे | ३० | ३५० |
| १८१ | बेलसर | ३० | २५० |
| १८२ | निरगुडे | २० | ५०० |
| | एकुण अंदाजे संख्या | | ४४००० |

* पुण्यातील गणेश उत्सवामधे पुणे व परिसरात अनेक ठिकाणी पब्लिक प्रोग्राम घेतले होते. त्यापैकी टिळकरोड न्यू इंग्लीश स्कूल समोरील अशोक विद्यालयात झालेल्या सहा -सात दिवस मिळून साधारण ७००० जणांनी जागृती घेतली.
* नवरात्री उत्सवामधे पुण्यातील कात्रज भागातील प्रसिध्द तळजाई मंदीराच्या परिसरात या कालावधीत साधारण ३५०० जणांनी जागृती घेतली
* पुण्यातील चतु:श्रृंगी परिसरात वर्षभर दर रविवारी संध्याकाळी ६.३० ते ९.०० या कालावधीत जागृतीचा कार्यक्रम करण्यात येतो. वर्षभरात साधारण ६००० जणांनी जागृती घेतली.

## नम्र आवाहन

पुणे परिसरातील भूकूम गावाजवळच्या खाटपेवाडी या ठिकाणी ( पुण्यातील सध्याची जागा पूजेच्यावेळी कमी पडत असल्याने तसेच पुढील काळातील प.पू.श्रीमाताजींची साकार पुजा कार्यक्रमासाठी) निसर्गरम्य परिसरातील ११ एकर जागा खरेदी करण्यात आली आहे

सदर जागेकरीता देणगी गोळा करण्याचे काम सूरू असून जागेतील डेव्हलपमेंट साठी मोठ्या रक्कमेची आवश्यक्ता आहे. तरी सर्व सहजयोगी बंधू- भगिनींना नम्र आवाहन करण्यात येते की, या ऐतहासिक प्रोजेक्टला सढळ हाताने देणगी देऊन आपणही भाग्यवान व्हा. देणगी चेकने/ डी.डी.ने देताना, '' विश्व निर्मल धर्म सोसायटी'' या नावाने पत्यावर (अनुक्रमणिकेत पत्ता दिलेला आहे.) पाठवावी.

## दिवाळी पूजा, पुणे





तरी न्यून ते पुरते । अधिक ते सरते ॥
करुनी घेयावे हे तुमते । विनवितु असे ॥





